लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले
सांज दैनिक : शनिवार – १९ ऑगस्ट २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १३९
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com




# वातावरण पावसाळी, पावसाचा पत्ताच नाही

## जिल्ह्यात केवळ २५% उपयूक्त पाणीसाठा

**लातूर : लातूर जिल्ह्यात अत्यल्प पाऊस झाला आहे. दोन दिवसापासून मुसळधार पाऊस पडेल असे वातावरण निर्माण झाले असले तरी दोन दिवसात पाऊस सरासरी १ ते २% मि.मि. च्या पुढे जात नाही. जिल्हा व जिल्ह्याशी संबंधीत मोठे, मध्यम, छोटे असे एकूण १७१ प्रकल्पात २५% (१९१ दलघमी) उपयूक्त पाणीसाठा असल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.**



जवळपास २३ ते २५ दिवसांपासून लातूर जिल्हा कोरडाच आहे. दोन दिवसापासून जिल्हाभर ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. हवामान खाते देखील महाराष्ट्रात पाऊस होणार, मराठवाड्याच्या काही जिल्ह्यात पाऊस पडणार असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पण मराठवाड्यातील कोणकोणत्या जिल्ह्यात पाऊस पडेल या अंदाजीत यादीत लातूर, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यांचा समावेश नाही. दोन दिवसापासून जिल्ह्यावर मात्र पावसाचे ढग दाटून आल्याचे दिसत आहे. 'केसळधार' म्हणावा असाच पाऊस चालू आहे.

लातूर जिल्ह्याशी संबंधीत मांजरा (केज) व निम्न तेरणा (लोहारा) या मोठ्या प्रकल्पासह १७१ प्रकल्प आहेत. त्यात ८ मध्यम, १३४ लघू, २७ बंधारे आहेत. या सर्वांमध्ये मिळून आजच्या तारखेत केवळ १९१ दलघमी म्हणजे २५% उपयूक्त पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच तारखेत ५२९.८८ दलघमी (६९%) उपयूक्त पाणीसाठा होता. आज धनेगाव धरणात २६% (गतवर्षी या तारखेत ४३%), निम्न तेरणा आज २८% (गतवर्षी ९२%), तावरजा मध्यम प्रकल्पात आज २% (गेल्यावर्षी ४१%), रेणापूर २४% (९८%), व्हटी आज ०% (गतवर्षी ६७%), तिरू प्रकल्प आज ०% (गतवर्षी ८१%) उपयूक्त पाणीसाठा आहे. तर गेल्यावर्षी आजच्या तारखेत देवर्जन, साकोळ, घरणी मध्यम प्रकल्प १००% भरलेले होते. आज मात्र देवर्जन ३९ %, साकोळ ५४%, घरणी प्रकल्प २८% एवढाच साठा आहे. मसलगा धरणात गेल्यावर्षी आजच्या तारखेत ८७% उपयूक्त साठा होता. आज ३० टक्के पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील १३४ लघू प्रकल्पात आज केवळ २३% पाणीसाठा आहे. गेल्यावर्षी हा साठा ७७% होता. जिल्ह्यात एकूण २७ बॅरेज आहेत. त्यात गेल्या वर्षी आजच्या तारखेत ४८% साठा होता. आज ३३% एवढा उपयूक्त पाणीसाठा आहे.

एकूणच जिल्हयात अत्यल्प पाऊस आहे. उपयूक्त पाणीसाठा अत्यल्प आहे. पिण्याचे व पिकासाठीच्या पाण्यासाठी जनता आता देवाकडे साकडे घालणे, धोंडी...धोंडी...पाणी दे सारखे पारंपारिक प्रयोग करत आहेत.



# बांबू लागवडीसाठी तीन वर्षांत हेक्टरी ७ लाख रूपये–नंदकुमार

लातूर : बांबू शेती ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी असून त्यासाठी लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळावे. शासनाने सातारा आणि लातूर या दोन जिल्ह्यांचा बांबू लागवड मिशनमध्ये समावेश केला आहे. एक हेक्टर बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मनरेगा) तीन वर्षापर्यंत ७ लाख रुपये कुशल, अकुशल मजुरीच्या रूपात दिले जाणार असल्याची माहिती मनरेगाचे राज्याचे महासंचालक नंदकुमार यांनी येथे दिली.


दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित बांबू लागवड कार्यशाळेत नंदकुमार बोलत होते. यावेळी माजी आमदार पाशा पटेल, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, एन. टी. पी. सीचे अधिकारी कदम, राजेंद्र शहाळे, बांबू विषयाचे अभ्यासक संजीव करपे, वन विभागाचे सेवा निवृत्त अधिकारी आणि बांबू लागवड तज्ज्ञ सलीम सय्यद, बांबू खरेदी व्यापारी संतोष राणे उपस्थित होते.

आपण शेती करताना पाण्याचा वापर अतिशय जास्त प्रमाणात करतो. त्यामुळे आपले एकरी उत्पादन अत्यल्प आहे. पिकाला योग्य ते पाणी देण्याचं नियोजन केलं तर आपण मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊ शकतो. आता लातूर जिल्ह्यासाठी बांबू लागवड मिशन अंतर्गत शासनाने शेतकऱ्यांना मोठी संधी निर्माण करून दिली आहे. तुमच्या शेताची माती आणि त्यात येणारी बांबूची व्हरायटी याचा अभ्यास करून बांबू लावा. तुमच्या सर्वांना एक प्रश्न पडला असेल, बांबू लावू पण विकत कोण घेणार? त्याचे मार्केट कुठे आहे? त्याचे उत्तर आहे, आता थर्मल पावरमध्ये वीज निर्माण करण्यासाठी आपण दगडी कोळसा वापरतो त्यात ५ टक्के बांबू बायोमास वापरण्याचे केंद्र सरकारने नियम केला आहे. ही टक्केवारी भविष्यात वाढणार आहे. त्यासाठी हजारो टन बांबू लागणार आहे. त्याच बरोबर विविध प्रकारचे फर्निचर यापासून बनतात. त्यामुळे बांबू विक्रीला हमखास गिऱ्हाईक मिळणार असल्याची माहिती नंदकुमार यांनी दिली.

लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी बांबू लागवड महत्वाची ठरणार आहे. त्यासाठी याचे सूक्ष्म नियोजन करून अधिकाधिक क्षेत्र बांबू लागवडीखाली आणून आपल्याला यातही लातूर पॅटर्न निर्माण करायचा आहे. त्यामुळे ग्रामस्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंतच्या प्रशासकीय यंत्रणांनी सक्रिय काम करायचे असून शेतकऱ्यांना बांबू लागवड त्यासाठी मनरेगाकडून कुशल, अकुशल मिळणारी आर्थिक मदत, रोपांची उपलब्धता, विक्रीला अजून तीन वर्ष आहेत. पण विक्री व्यवस्था पण सांगावी त्यातून शेतकरी पुढे येतील. वातावरण बदल, प्रदूषण यावर मात करायची असेल तर बांबू लागवड हा उत्तम पर्याय आहे. गावांनी ठरवलं तर हे सहज शक्य असल्याचे सांगून यामुळे लातूर जिल्ह्याचा ग्रीन बेल्टही वाढणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी सांगितले.

आपल्याला पुढच्या पिढीला शुद्ध हवा आणि पाणी द्यायचं असेल तर हवेतलं कार्बनच प्रमाण कमी करावं लागेल आणि मातीची धूप थांबवून जमिनीत पाणी मुरवावं लागेल. त्यासाठी बांबू लागवड हा आर्थिकदृष्ट्या उत्तम पर्याय आहे. बांबू हे गवतवर्गीय केल्यामुळे तुम्हाला लागवड आणि तोड करण्यासाठी कुठलेही बंधन नाही. बांबूचा उपयोग इथेनॉल पासून ते थर्मल पॉवरचं इंधन म्हणून होत असल्यामुळे हे बहुउद्देशीय पीक तुम्हाला अत्यंत फायदेशीर असल्याचे माजी आमदार पाशा पटेल यांनी विविध उदाहरणासह पटवून दिले.

बांबू विक्री, बांबू लागवड कशी करावी यासह थर्मल पॉवरमध्ये इंधन म्हणून वापरताना बांबूची कॅलरीक क्षमता दगडी कोळशा एवढीच असल्याचे या प्रशिक्षणामध्ये सांगण्यात आले. यावेळी गादवड, आलमला, किल्लारी, वडजी, जेवरी यासह बांबू लागवड करणाऱ्या दहा गावांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. वैयक्तिक बांबू लागवड करणारे शेतकरी आर. बी. पाटील यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. बांबू लागवडीविषयी माजी आ. पाशा पटेल यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात सर्वांचा सत्कार करताना बांबू पासून बनवलेल्या मुर्त्या, बांबूचे रोप देवून करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.



# आ. पाटील यांची आमदारकी रद्द करा

## औसा पत्रकार संघाची मागणी

औसा : पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांच्यावर झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ शुक्रवार, दि. १८ ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह औसा येथे बैठक घेऊन निषेध व्यक्त करण्यात आला.या घटनेतील मारहाण करणाऱ्या आमदारांसह गुंडाविरुध्द पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा.यासह आ.किशोर पाटील यांची आमदारकी रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन औसा तहसीलदार यांना कारवाई औसा तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आले.

आमदार किशोर पाटील यांनी पत्रकार संदिप महाजन यांना माझ्या विरोधात बातमी का लिहिली म्हणून प्रथम शिवीगाळ केली, त्यानंतर आपल्या गुंडाकडून चौकात गाडी आडवुन, अमानुषपणे मारहाण केली. यात ते गंभीर जखमी झाले असून सदरची घटना निंदनीय आहे.लोकशाहीच्या चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारावर बातमी का दिली या कारणावरून मारहाण केली.या घटनेचा सबंध पत्रकारांच्या वतीने निषेध करुन पोलिस प्रशासनाने या घटनेची त्वरित दखल घेऊन गुन्हा दाखल करावा.जेणेकरून भविष्यात अशा घटना घडणार नाहीत.यावेळी वरील मागण्याचे लेखी निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी पत्रकार संघांचे अध्यक्ष काशिनाथ सगरे ,सचिव महेबुब बक्षी, जेष्ठ पत्रकार राजू पाटील,संजय सगरे,राम कांबळे, उपाध्यक्ष बालाजी उबाळे, सहसचिव विनायक मोरे,विठ्ठल पांचाळ,विलास तपासे, एस.ए.काझी, इलियास चौधरी, वामन अंकुश, श्रीधर माने,शिवाजी मोरे,महेश कोळी,मजहर पटेल,पाशा शेख,यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थीत होते.

# ऑटो दोन क्रमांक एक; ऑटो चालकास अटक

लातूर : आपल्या स्वतःच्या ऑटोला स्वतंत्र वाहन क्रमांक असताना दुसऱ्या ऑटोचा वाहन क्रमांक वापरून शासनाची व दुसऱ्या ऑटो मालकाची फसवणूक करणाऱ्या ऑटो चालकास लातूर शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी मोठ्या शिताफीने पकडून त्याच्याकडील ऑटोही जप्त केला आहे. या प्रकरणी गांधी चौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१८ ऑगस्ट २०२३ रोजी वाहतूकीचे नियमन करीत असताना वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांना माहिती मिळाली की, लातूर शहरांमध्ये एक ऑटो चालक त्याच्या ऑटोचा नंबर बदलून दुसऱ्या एका ऑटोचे नंबर लावून प्रवासी वाहतूक करीत असून एकाच क्रमांकाचे दोन ऑटो प्रवासी वाहतूक करीत आहेत.अशी माहिती मिळाल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी ड्युटीवरील वाहतूक नियमन करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना वायरलेस द्वारे ऑटो बद्दल माहिती देऊन दोन्ही ऑटो ताब्यात



घेण्याबाबत सूचना दिल्या.

त्या अनुषंगाने वाहतूक पोलिसांनी तात्काळ कार्यवाही करत प्रवासी वाहतूक करीत असलेले एकाच क्रमांकाचे दोन ऑटो ताब्यात घेऊन वाहतूक नियंत्रण शाखेत आणले. दोन्ही ऑटो चालकाकडे असलेल्या ऑटोच्या कागदपत्राची पाहणी केली असता ऑटो चालक हरी श्रीरंग माळी हा त्याच्या ताब्यातील ऑटोचा क्रमांक MH 12 HQ 5385 असा असतानाही जाणीवपूर्वक MH 24 -T 2209 असे लिहून लातूर शहरात प्रवासी वाहतूक करता यावी व ई-चलनाचा दंड आला तरी तो दुसऱ्याच क्रमांकावर जाईल या हेतूने शासनाची व मूळ ऑटो चालकाची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले.

वाहतूक नियंत्रण शाखेतील पोलीस अंमलदार रसूल सय्यद यांनी दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे गांधी चौक येथे हरी श्रीरंग माळी याचे विरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०५/२०२३ कलम ४२० भादवी तसेच ६६ (१)/ १९२ मोटार वाहन कायदा कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास नारायण बनसोडे हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, (लातूर शहर) भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती प्रतिभा ठाकूर, पोलीस अमलदार सुग्रीव नागरगोजे, मद्देवाड, घोगरे, बिराजदार, रसूल सय्यद यांनी केली आहे.

## त्यांच्या मते....

▣ **सध्या आमचं दुकान जोरात चालू आहे पण सर्व ग्राहक नवेच.**

– नितीन गडकरी

नवे ग्राहक देव, जुने निष्ठावान

▣ **हर्षवर्धन पाटील हे जातीचे राजकारण करतात.**

– माजी मंत्री दत्तात्रय भरणे

भांडवलच त्यांचं ते.

▣ **बाळासाहेबांच्या पुण्याईने भाजपाला बसायला खुर्ची मिळाली.**

– विजय वडेट्टीवार

भाजपाला दिली ओसरी, हळूहळू खुर्ची पसरी

▣ **बीड जिल्हा गद्दारांना शिकवेल धडा, लबाडांना देईल हाबाडा.**

–सक्षणा सलगर

आदित्य ठाकरे यांचा पेग्वीन असा उल्लेख करून सक्षणा याअगोदर तोंडघशी पडल्या होत्या.

# निखळ मैत्रीसाठी रॅगींगला आळा घाला

लातूर : कृषिचे विद्यार्थी हे आदर्श नागरिक म्हणून सामाजिक बांधिलकी जपणारे आहेत. विद्यार्थी जीवनात मैत्रीला अनन्यसाधारण महत्व आहे. रॅगींग मधून केवळ आपापसात दुजाभाव निर्माण होतो. म्हणून निखळ मैत्रीसाठी रॅगींगला आळा घालणे हे विद्यार्थी म्हणून तुमचे पहिले कर्तव्य आहे. रॅगींगविषयी सतर्क राहून या अपप्रवृत्तीपासून दूर राहून स्वतःचा व सामाजाचा विकास साधावा असेही प्रतिपादन कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी केले.



कृषि महाविद्यालयात दि: १२ ते १८ ऑगस्ट दरम्यान अँटी रॅगींग जागरूकता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब ठोंबरे बोलत होते.या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूरचे अपर जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, विलासराव देशमुख कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.जगदीश जहागीरदार व डॉ.विश्र्वनाथ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.या वेळी मार्गदर्शनपर भाषणात डॉ.देवरे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी आभासी जगापासून बाहेर येणे आवश्यक आहे. भ्रमणध्वनी, संगणक व इंटरनेटचा वापर हा शुद्ध हेतूने व प्रामाणिकपणे स्वतःचे जीवन आनंददायी जगण्यासाठी करावा.

या सप्ताहामध्ये वृक्ष संवर्धन, निबंध व घोषवाक्य स्पर्धा तसेच इतर अनेक स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. या प्रसंगी कु.निकिता दराडे, कु.अर्चना झिंझे व चि.सर्वेश शिंदे या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करून त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. देश हितासाठी विद्यार्थ्यांनी कायम तत्पर राहावे यासाठी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, माझी माती माझा देश या अभियानांतर्गत त्यांना पंचप्राण शपथ देण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्षा डॉ.ज्योती देशमुख, सूत्रसंचालन चि.समर्थ तुपकर, तर आभार प्रदर्शन डॉ.प्रभाकर आडसूळ यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.विलास टाकणखार, डॉ.विठोबा मुळेकर, डॉ.व्यंकट जगताप, डॉ.विजय भामरे रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.अनिलकुमार कांबळे, डॉ.नितीन तांबोळी, डॉ.ज्ञानेश्र्वर सुरडकर, डॉ.सुनिता मगर, श्री.देविदास चामणीकर यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा; मनसेचे आंदोलन

लातूर : लातूर जिल्ह्यात पावसाने २१ दिवसांपासून उघडीप दिल्याने शेतकऱ्यांच्या पिकांनी माना टाकल्या असून पीक जिल्हाभर वाळत आहे तरी शासनाने जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत जाहीर करावी अशी मागणी मनसेचे सरचिटणीस तथा शेतकरी सेनेचे प्रदेशअध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मनसेने केलेल्या आंदोलनादरम्यान केली.

पुढे बोलताना त्यांनी या आठवड्यात जर शासनाने दुष्काळ जाहीर नाही केला तर मंत्र्यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही व संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी सोबतीला घेऊन रस्त्यावर उतरू असा इशारा दिला आहे. या तीव्र निदर्शने आंदोलनात मोठया संख्येने जमलेल्या मनसैनिकांनी बराच काळ जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनाची सांगता जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन




देऊन करण्यात आली.ज्यात जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासोबतच वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत मिळावी व पूढील काळात शेतकऱ्यांना त्रास होणार नाही यासाठी हरीण, रानडुक्कर या वन्यप्राण्यांचा प्रतिबंध करावा,जिल्हयातील पिके वाळत असल्याने पिक विमा कंपनीने जिल्हाभरातील शेतकऱ्यांना पिकविम्याची २५% अग्रीम रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ द्यावी,९९२ व इतर सोयाबीनचे बोगस बियाणे शेतकऱ्यांना विकणाऱ्या बिजोत्पादन कंपन्यावर कडक कार्यवाही करावी तसेच खत बीयाण्याची लिंकीग, चढयादराने खत बियाण्याची व किटकनाशकाची विक्री करणाऱ्या कृषी दुकानदारांवर कार्यवाही करावी,गोगलगाय व इतर रोगांमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करुन त्यांना तात्काळ मदत देण्यात यावी,माजी विभागीय आयुक्त केंद्रेकर यांची शिफारस स्वीकारुन त्यानुसार खरीप व रब्बी पेरणीपूर्वी प्रत्येक शेतकऱ्यांना एकरी दहा हजार रुपयांची मदत देण्यात यावी, प्रचंड नूकसान होऊनही पिकविमा कंपण्या शेतकऱ्यांना विमा देत नाहीत कंपण्या स्वतःच्या नफेखोरीसाठीच काम करतात असे सिद्ध झाले आहे.

त्यामुळे असा मनमानी कारभार करणाऱ्या कंपण्यांना ब्लॅकलिस्टेड करावे व शेतकऱ्यांना फसवणाऱ्या कंपण्यावर कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अश्या शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक बाबींचा समावेश आहे.या आंदोलनात मनसे प्रदेश सरचिटणीस तथा शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाणे आदींसह मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंतराळात चालते कायद्याचे हे पुस्तक, शस्त्रे नेण्यास मनाई, मोहिमेचे नुकसान झाले, तर करावी लागते भरपाई

जगभरात अवकाश मोहिमांची शर्यत सुरू आहे, दरवर्षी असंख्य मोहिमा अवकाशात सोडल्या जातात, काही देश मंगळावर उतरतात, तर काही सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतात. चंद्राविषयी बोलायचे झाले, तर नासाने आतापर्यंत १२ मोहिमा सुरू केल्या आहेत आणि २४ वेळा त्याचे विघटन झाल्यानंतर तयार झालेले सोव्हिएत युनियन आणि रशिया, यापैकी अनेक मोहिमा चंद्राच्या पृष्ठभागावरही उतरल्या आहेत, पण तुम्ही कधी विचार केला आहे की त्या इतक्या यशस्वी झाल्या आहेत. मोहिमेनंतरही कोणत्याही देशाच्या ताब्यात अंतराळातील जागा का नाही?

याचे कारण म्हणजे ५६ वर्षांपूर्वी झालेला संयुक्त राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय अंतराळ करार. या नियमांतर्गत अंतराळ मोहिमांसाठी अनेक नियम आणि धोरणे निश्चित करण्यात आली आहेत, ज्यात अंतराळ क्रियाकलाप, शस्त्रे बाळगण्यावर बंधने आणि अंतराळातील कोणत्याही अपघात किंवा दुर्घटनांची जबाबदारी यांचा समावेश आहे. एका देशाच्या मिशनमुळे दुसऱ्या देशाच्या मिशनला हानी पोहोचली, तर त्याचीही भरपाई देण्याची व्यवस्था आहे.

### आंतरराष्ट्रीय अंतराळ करार म्हणजे काय

अंतराळ कायदा १९१९ मध्ये लागू करण्यात आला. या अंतर्गत सर्व देशांना त्यांच्या भौगोलिक क्षेत्रापेक्षा जास्त हवाई क्षेत्राचे सार्वभौमत्व देण्यात आले होते, परंतु जेव्हा देशांतर्गत अंतराळ मोहिमा सुरू झाल्या, तेव्हा एक करार आवश्यक होता ज्यामध्ये सर्व देशांना सामील करून घ्यायचे होते. १९५७ मध्ये जेव्हा सोव्हिएत युनियनने आपला पहिला कृत्रिम उपग्रह स्पुतनिक-१ प्रक्षेपित केला, तेव्हा संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ कराराचा आग्रह धरला, कारण कोणत्याही देशाच्या अंतराळ मोहिमेला दुसऱ्या देशाच्या अंतराळ सीमा ओलांडणे आवश्यक होते. यानंतर एरोस्पेस कायद्यापासून वेगळे अंतराळ नियम बनवण्यात आले. १९६७ मध्ये याला आंतरराष्ट्रीय अवकाश करार म्हणून मान्यता मिळाली. भारत सुरुवातीपासून या कराराचा एक भाग आहे.

### हे आहेत अंतराळातील नियम

१९६७ मधील आंतरराष्ट्रीय अंतराळ कराराची पहिली अट होती की कोणत्याही देशाने अंतराळाचे कोणतेही क्षेत्र व्यापले




जाणार नाही. करारानुसार, संयुक्त राष्ट्रांचे सदस्य देश इतर कोणत्याही देशाच्या बाह्य अवकाश मर्यादा वापरू शकतात.

स्पेस मिशनसह शस्त्रे वाहून नेली जाऊ शकत नाहीत, विशेषतः अशा प्रकारची सामूहिक विनाश किंवा मोठ्या प्रमाणावर विनाश करणारी शस्त्रे.

या करारामध्ये बचाव कराराला महत्त्व देण्यात आले होते, ज्या अंतर्गत सर्व राष्ट्रांची पहिली जबाबदारी त्यांच्या अंतराळवीरांची सुरक्षा असते, जर एखादे मिशन अडचणीत असेल तर सर्व देश मदत करतील आणि अंतराळवीरांना परत आणण्यासाठी प्रयत्न करतील.

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत लागू करण्यात आलेला आणखी एक प्रमुख नियम म्हणजे एखाद्या देशाच्या अंतराळ मोहिमेमुळे दुसऱ्या देशाच्या अंतराळ मोहिमेचे नुकसान झाल्यास संबंधित देश जबाबदार असेल आणि त्याची भरपाई करेल.

करारांतर्गत, अंतराळातील वाहतूक सुसंवाद साधण्यासाठी नियमही बनवले गेले आहेत, ज्या अंतर्गत सर्व देशांना एकमेकांना सहकार्य करावे लागेल, जेणेकरून अंतराळ मोहिमांमध्ये संघर्ष होऊ नये. अंतराळातील प्रदूषणासाठी अवकाशात मोहिमा पाठवणाऱ्या सर्व देशांना काम करावे लागणार आहे. अवकाशातून पडणाऱ्या उपग्रह किंवा रॉकेटच्या ढिगाऱ्यांमुळे कोणतीही हानी होणार नाही, हे ठरवावे लागेल.

### रशिया आणि चीनची मनमानी

१९७९ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी चंद्र करारही तयार केला होता, त्याचा मुख्य उद्देश हा होता की अवकाशाचा व्यावसायिक वापर कधीही होऊ नये. चीन आणि रशिया यांनी संयुक्त राष्ट्रांच्या या करारापासून स्वतःला दूर ठेवले, त्यांचा युक्तिवाद असा होता की अमेरिकेला अवकाशाचे सर्व नियम बनवण्याचा अधिकार नाही.

# कमी होणार कर्जाच्या हफ्त्याचे ओझे, RBI ने जारी केली मार्गदर्शक तत्वे

कोविडनंतर देशात ज्या प्रकारे महागाई वाढली आणि ती कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने व्याजदर वाढवायला सुरुवात केली, त्यामुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. जुन्या कर्जाच्या ईएमआयमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने सर्वसामान्यांवर कर्जाचा बोजा सातत्याने वाढत आहे. ज्याची तक्रार सातत्याने आरबीआयपर्यंत पोहोचत होती. आता हा भार कमी करण्यासाठी आरबीआयने नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. आरबीआयने बँका आणि एनबीएफसीसह इतर वित्तीय संस्थांना व्याजदर पुन्हा निश्चित करताना निश्चित दर निवडण्याचा पर्याय कर्जदारांना देण्यास सांगितले आहे. आरबीआयने शुक्रवारी अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेमध्ये सेंट्रल बँकेने म्हटले आहे की, असे दिसून आले आहे की व्याजदरात वाढ झाल्यामुळे कर्जाची मुदत किंवा मासिक हप्ता म्हणजे ईएमआय वाढवला जातो आणि ग्राहकांना त्याबाबत योग्य माहिती दिली जात नाही किंवा त्यांची संमतीही घेतली जात नाही. या चिंतेवर मात करण्यासाठी, रिझर्व्ह बँकेने त्यांच्या नियमनाखाली येणाऱ्या युनिट्सना योग्य धोरण आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. आरबीआयने म्हटले आहे की कर्ज मंजुरीच्या वेळी, बँकांनी त्यांच्या ग्राहकांना स्पष्टपणे सांगावे की मानक व्याजदरात बदल झाल्यास, ईएमआय किंवा कर्जाच्या कालावधीवर काय परिणाम होऊ शकतो. एखाद्या कर्जाची मुदत वाढवण्याबाबतची माहिती योग्य चॅनेलद्वारे ग्राहकांना त्वरित दिली जावी. सेंट्रल बँकेने म्हटले आहे की व्याजदर नव्याने निश्चित करताना बँकांनी ग्राहकांना निश्चित व्याजदर निवडण्याचा पर्याय द्यावा. याशिवाय, पॉलिसी अंतर्गत, ग्राहकांना हे देखील सांगितले पाहिजे की त्यांना कर्जाच्या कालावधीत किती वेळा हा पर्याय निवडण्याची संधी मिळेल. यासह, कर्जदारांना ईएमआय किंवा कर्जाचा कालावधी किंवा दोन्ही वाढवण्याचा पर्याय दिला पाहिजे. ग्राहकांना वेळेपूर्वी पूर्ण किंवा काही प्रमाणात कर्ज भरण्याची मुभा द्यावी, असे अधिसूचनेत म्हटले आहे. ही सुविधा त्यांना कर्जाच्या कालावधीत कधीही उपलब्ध असावी. गेल्या आठवड्यात चलनविषयक धोरणाच्या बैठकीत, आरबीआयने कर्जदारांना फ्लोटिंग व्याजदरावरून निश्चित व्याजदराची निवड करण्याची परवानगी देण्याबद्दल बोलले होते. यासाठी नवीन फ्रेमवर्क तयार करण्यात येत असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले होते. या अंतर्गत बँकांना कर्ज घेणाऱ्या ग्राहकांना कर्जाचा कालावधी आणि ईएमआयची संपूर्ण माहिती द्यावी लागेल.

# गरीबांना मोफत कायदेशीर मदत देण्यासाठी टेलि लॉ सेवा हे आहे एक 'शस्त्र', जाणून घ्या तुम्ही देखील कसा घेऊ शकता फायदा




टेली-लॉ (Tele-Law) कार्यक्रम

टेलि लॉ सेवा सध्या चर्चेत आहे. ताज्या चर्चेचे कारण म्हणजे त्याची रेडिओ जिंगल, जी ऑल इंडिया रेडिओच्या सर्व २७२ केंद्रांद्वारे लोकांना जागरूक करत आहे. हे प्रेरणा देते की जेव्हा जेव्हा कायदेशीर मदतीची आवश्यकता असेल, तेव्हा तुमच्या जवळच्या सामान्य सेवा केंद्राशी संपर्क साधा. केंद्र सरकारचा हा उपक्रम चर्चेद्वारे प्रकरणे निकाली काढण्यासाठी आहे, जेणेकरून गरिबांनी पोलीस चौकी-पोलीस ठाणे-कोर्टाच्या फेऱ्या मारणे टाळता येईल.

त्याचा परिणामही दिसून येत आहे. या मोहिमेअंतर्गत, सुरुवातीपासून ते ३१ जुलै २०२३ पर्यंत, ४८.११ लाखांहून अधिक प्रकरणांची नोंद करण्यात आली होती आणि त्यापैकी ४७.५२ लाखांचे निराकरण करण्यात आले आहे. या ४८.११ लाखांहून अधिक प्रकरणांपैकी निम्मी प्रकरणेही टेलि लॉ सेवेपर्यंत पोहोचली असती, तर न्यायालयांवर किमान २४ लाख खटल्यांचा अतिरिक्त भार पडला असता. अशा प्रकारे हा प्रयोग यशस्वी मानला जातो.

न्याय विभागाने २०१७ मध्ये टेली लॉ सेवा सुरू केली. यामध्ये देशभरात पसरलेल्या २.५० लाख सामान्य सेवा केंद्रांची मदत घेण्यात आली. गरीब, एससी-एसटी समुदायातील लोकांना कायदेशीर मदत देणे, हा त्याचा उद्देश होता. यामध्ये राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाची मदत घेण्यात आली. यासाठी रेडिओच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

सुरुवातीला या योजनेची प्रगती संथ होती परंतु आता देशभरातील लोक त्यांच्या कायदेशीर समस्यांसाठी त्यांच्या जवळच्या उडड मध्ये पोहोचत आहेत. सरकारने नामनिर्देशित केलेले वकील व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांचे म्हणणे ऐकून घेत आहेत आणि सूचना देत आहेत. आता सरकारने टेलि लॉ मोबाइल ॲपही बनवले आहे. या ॲपद्वारे कोणतीही व्यक्ती कायदेशीर मदतही घेऊ शकते. तुम्हाला किंवा तुमच्या शेजाऱ्याला कायदेशीर मदत हवी असल्यास, त्यासाठी तुम्हाला जवळच्या कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये पोहोचावे लागेल. तेथे केंद्र प्रभारी केस ऐकून तुमची केस नोंदवतील. मग सरकारकडून तुम्हाला वकील म्हणून नामनिर्देशित केले जाईल. तुम्हाला याचीही माहिती दिली जाईल आणि वकील कधी ऑनलाइन उपलब्ध होईल. त्यानंतर वकिलाशी बोलण्यासाठी तुम्हाला पुन्हा कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये यावे लागेल. तुम्ही तुमची समस्या वकिलाला सांगाल. ते ऐकून आणि समजून घेऊन तुम्हाला कायदेशीर मदत करतील.

जर तुम्हाला कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये जायचे नसेल, तर सरकारने यासाठी टेलि लॉ हे मोबाइल ॲप उपलब्ध करून दिले आहे, जिथे नोंदणी केल्यानंतर तेच वकील तुम्हाला घरी बसून मदत करतील. फक्त तुमच्या फोनमध्ये चांगले इंटरनेट असावे. नेटवर्कची समस्या असल्यास, कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये जाणे चांगले.

सर्वोच्च न्यायालयाचे वकील अश्वनी दुबे म्हणतात की विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ मध्ये अशी तरतूद आहे की सरकार गरीब, दलित आणि मागासलेल्या लोकांना सार्वत्रिक न्यायासाठी मदत करेल. यासाठी सरकारने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना केली. कालांतराने त्याचे युनिट तहसील स्तरापर्यंत उघडण्यात आले, ते आजही उपलब्ध आहेत. ज्यांच्याकडे माहिती आहे, तेही त्याचा फायदा घेत आहेत.

टेली लॉ सेवा सरकारने २०१७ मध्ये सुरू केली होती. कारण तेव्हा देशात इंटरनेट सुविधा चांगली झाली होती. त्यात दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. ही मोहीम उपयुक्त ठरत आहे कारण सरकारकडे देशभरात २.५० लाख सामान्य सेवा केंद्रे उपलब्ध आहेत. येथे पोहोचल्यानंतर कोणतीही व्यक्ती स्वतःची नोंदणी करेल. त्यामुळे त्याला वकिलाला वेळ मिळेल. त्याची माहिती मोबाईलवरही देण्याची व्यवस्था आहे. ठरलेल्या वेळी त्या व्यक्तीला पुन्हा एकदा यावे लागेल. वकीलही ऑनलाइन उपलब्ध असतील.

सर्व आकडेवारी ढ्ढश्रश्रश्व च्या वेबसाईटच्या होम पेजवर उपलब्ध आहे. याठिकाणी कॉमन सर्व्हिस सेंटरचे कर्मचारी व वकिलांनी चांगली कामगिरी केल्याचे चित्र पाहून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. कोणत्या वकिलाने किती प्रकरणे निकाली काढली याचीही नोंद आहे. उडड पर्यंत पोहोचलेल्या आणि मदत मिळवण्यात यशस्वी झालेल्या लोकांचे अनुभव देखील येथे दिले आहेत.

# फोनच्या कव्हरमध्ये ठेवलेल्या १० रुपयांच्या नोटेमुळे होऊ शकते मोठे नुकसान



तुम्हीही तुमच्या फोनच्या कव्हरमध्ये पैसे किंवा कोणताही कागद ठेवत असाल तर काळजी घ्या. अन्यथा, तुमच्यासोबत एक जीवघेणा अपघात होऊ शकतो, ज्यामध्ये तुमचा मोबाईल स्फोट होऊ शकतो. किंबहुना, यापूर्वी आलेल्या वृत्तांनुसार, मोबाईल फोनमध्ये स्फोट होण्याचा धोका आहे आणि यामध्ये वापरकर्त्यांच्या केवळ छोट्या चुका स्फोट घडवून आणत आहेत. अशा परिस्थितीत फोनच्या कव्हरमध्ये पैसे किंवा कोणताही कागद ठेवू नये. येथे आम्ही तुम्हाला फोनमध्ये पैसे ठेवल्याने कोणत्या समस्या येऊ शकतात आणि त्यामुळे किती नुकसान होऊ शकते ते सांगणार आहोत.

फोनमध्ये स्फोट होण्यामागे अनेक कारणे आहेत, त्यापैकी एक म्हणजे फोनच्या कव्हरमध्ये नोट्स ठेवणे. खरं तर, तुम्ही अनेकदा पाहिले असेल की फोन गरम होऊ लागतो, यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे फोनमध्ये नोट ठेवणे किंवा फोनवर जाड कव्हर असणे.

जेव्हा तुम्ही फोन सतत वापरता तेव्हा फोन गरम होऊ लागतो, फोनच्या कव्हरमध्ये पैसे किंवा कव्हर ठेवल्यामुळे त्याला थंड होण्यासाठी जागा मिळत नाही, ज्यामुळे फोन जास्त गरम होतो आणि स्फोट देखील होऊ शकतो.

फोनचे कव्हर जाड असून त्यात पैसे ठेवल्यास वायरलेस चार्जिंगमध्येही समस्या निर्माण होऊ शकतात.

फोनच्या कव्हरमध्ये नोट ठेवल्याने कधीकधी नेटवर्क समस्या उद्भवू शकतात. चार्जिंग करताना फोन वापरल्यानेही फोनचा स्फोट होतो.

वर नमूद केल्याप्रमाणे, जर तुम्ही फोनच्या कव्हरमध्ये पैसे ठेवले, तर त्यामुळे तुमचे बरेच नुकसान होऊ शकते. यामुळे तुमचे हजारो रुपयांचे नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला तुमचा फोन जास्त काळ चालायचा असेल आणि ब्लास्ट होऊ नये, तर या टिप्स फॉलो करा.

# उच्च शिक्षणाच्या वाटेवरील गळती

आपल्या देशातील आयआयटी, आयआयएम अशा प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि गळती हे देशाचे अत्यंत वेदनादायी असे वास्तव आपल्या समोर येत आहे. गेल्या पाच वर्षांत या संस्थांमध्ये शिकणाऱ्या जवळपास शंभर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची आणि ३४ हजारांच्या आसपास विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडून दिल्याची सरकारने संसदेत दिलेली आकडेवारी अंगावर काटा आणणारी आहे. त्यातही आयआयटीशी संबंधित दोन्हींचा आकडा मोठा आहे. देशभरातील २३ आयआयटीमधील ३९ जणांनी गेल्या पाच वर्षांत मृत्यूला कवटाळले.

१९६८ मध्ये भारतीय दंड संहितेतील काही नियम बदलण्यात आले. त्यानंतर १९८० मध्ये मुलांची शाळेत शिकण्याची पद्धत बदलली. आता २०२० मध्ये, त्यांनी मुलं शिकण्याच्या पद्धतीत पुन्हा नवीन बदल केले. गेल्या दहा वर्षांत, अधिकाधिक लोकांना नोकरी मिळू शकली नाही, जरी त्यांनी महाविद्यालयात जाऊन पदव्या मिळवल्या. यामुळे ते उपजीविकेचे इतर मार्ग शोधतात. तरुणांना योग्य दिशेने मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालय कशी मदत करू शकतात याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञान आणि माध्यमे आपल्या जीवनाचा एक मोठा भाग बनली आहेत.

लोकांना नेहमी आनंदी राहायचे असते आणि ते त्यांचे जीवन सोपे करण्यासाठी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतात, परंतु काहीवेळा, यामुळे सामाजिक समस्या उद्भवू शकतात आणि नकारात्मक परिणाम होऊ शकतात. अधिकाधिक विद्यार्थी महाविद्यालयात जात आहेत, परंतु काहींना भीती वाटते की शिक्षण फारसे चांगले होणार नाही. तेथे बरीच महाविद्यालये आणि विद्यापीठे आहेत, परंतु नियमित महाविद्यालयात जात नाहीत. अधिकाधिक मुलांनी महाविद्यालयात जावे अशी सरकारची इच्छा आहे, म्हणून ते तसे करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते अधिक चांगले करू शकतील की नाही हे पाहण्यासाठी ते खूप पूर्वीची जुनी योजनादेखील पहात आहेत.


कॉलेजमध्ये प्रत्येक शिक्षकामागे ठराविक विद्यार्थी असतील. पॉलिसी जे सांगते त्यापेक्षा जास्त विद्यार्थी वर्गात असल्यास, काय व्हायला हवे हे ते सांगत नाही. काही शिक्षक जे एका विशिष्ट पद्धतीने काम करतात त्यांना नवीन नोकऱ्या शोधाव्या लागतील, परंतु त्यांचे मूल्यमापन कसे केले जाईल किंवा त्यांचे काय होईल हे धोरण सांगत नाही. शिक्षकांना कायमस्वरूपी नोकऱ्या असतील, असे धोरणात म्हटले आहे, परंतु त्यांना किती वेतन मिळेल किंवा ते कसे ठरवले जाईल, हे सांगितलेले नाही. पॉलिसीमध्ये मोबदला व्यवस्थापन नावाची संज्ञा आहे, परंतु त्याचा अर्थ काय आहे हे स्पष्ट करत नाही. काही महाविद्यालये बंद करून नवीन अभ्यासक्रम तयार केले जातील.

यासाठी बराच वेळ लागेल कारण जुनी आणि नवीन यंत्रणा एकत्र चालवावी लागणार आहे. सरकारला अनेक महाविद्यालये बंद करून मोजकीच ठेवायची आहेत. बंद होणारी महाविद्यालयांना त्यांच्या शिक्षकांसाठी आणि उपकरणांसाठी नवीन जागा शोधाव्या लागतील. हे सर्व बदल व्हायला वेळ लागेल. विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये कोणताही फरक राहणार नाही, असे धोरणात म्हटले आहे. प्रत्येक महाविद्यालय उच्च शिक्षण किंवा संशोधन किंवा दोन्हींवर लक्ष केंद्रित करेल. यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक अधिक कुशल बनतील आणि संशोधनाचा दर्जा सुधारेल. काही महाविद्यालये गरज पडल्यास परदेशी विद्यापीठे किंवा संशोधकांसोबतही काम करू शकतात. तशी सुरुवात मुंबई विद्यापीठाने केली आहे.

प्रश्न अनेक आहेत, आपल्या देशातील आयआयटी, आयआयएम अशा प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि गळती हे देशाचे अत्यंत वेदनादायी असे वास्तव आपल्या समोर येत आहे. गेल्या पाच वर्षांत या संस्थांमध्ये शिकणाऱ्या जवळपास शंभर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची आणि ३४ हजारांच्या आसपास विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडून दिल्याची सरकारने संसदेत दिलेली आकडेवारी अंगावर काटा आणणारी आहे. त्यातही आयआयटीशी संबंधित दोन्हींचा आकडा मोठा आहे. देशभरातील २३ आयआयटीमधील ३९ जणांनी गेल्या पाच वर्षांत मृत्यूला कवटाळले. त्याखालोखाल प्रत्येकी २५ विद्यार्थी केंद्रीय विद्यापीठे आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजे एनआयटीमधील आहेत. पदवी घेऊन आयआयटीयन्स होऊ पाहणाऱ्या किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आठ हजारांहून अधिक तरुण-तरुणींनी शिक्षण अर्धवट सोडून दिले.

असे का होत आहे? त्यांच्यासमोर कोणते तणावजन्य प्रसंग येत आहेत. हा एक संशोधनाचा विषय आहे. आपली शिक्षण व्यवस्था आपण सक्षम करताना शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मानसिकता सक्षम करण्यात आपण अपयशी ठरत आहोत काय? माणूस म्हणून जगण्याचे भान देण्यात आपल्या हातून काही कमी होत आहे. जीवन सुंदर आहे ते फुलवण्याचे काम स्वतःचा स्वतःला करायचे आहे. मग आपण या लढाईत हार मानून मागे का राहतो आहे. गणित शिकताना नियमांचा अंगिकार करून गणित सोडवणे क्रमप्राप्त आहे मग जीवनाचे गणित सोडविताना त्याचे नियम आपल्याकडून चुकत असतील तर ते दुरुस्त करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे.

शिक्षण घेताना काही गोष्टींचा त्याग ज्या त्या वयात करणे आवश्यक आहे. जो वेळ शिकण्यासाठी आहे. त्या वेळेचा त्याग करून कसे चालेल. चल उचल गड्या बौद्धिकतेचे हत्यार तुला नव्या जगाची आण हे कायम लक्षात ठेवून पुढे जाणे आवश्यक आहे. मन शुद्ध तुझं असेल तर जगातील जी जी गोष्ट ठरवली आहे ध्येयाप्रमाणे तुला योग्यवेळी मिळत जाईल.



आपल्या भारताच्या विविध भागातून येणाऱ्या आत्महत्यांच्या बातम्या वाचल्या की त्यांना अभ्यासक्रम रुचत नाही का?, काही विषय जमत नाहीत का?, अभ्यासाचा मानसिक तणाव वाढत आहे का?, घरापासून दूर राहणे यातून मानसिक दोलायमानता अशी कारणे समोर येतात. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांमधील गळतीचे मुख्य कारण समोर आले आहे ते पदवीनंतर मिळणाऱ्या नोकरीच्या संधींचे. कारण कुटुंबाची जबाबदारी या मुलांच्या खांद्यावर येत आहे ते स्वाभाविकही आहे. पदवीनंतरही पुढचे शिक्षण सुरू ठेवण्यासारखी परिस्थिती सगळ्यांच्याच घरी असते असे नाही.

शैक्षणिक शुल्क न परवडणारे असते. याला आपलाच मध्यम वर्ग समाज जबाबदार आहे. पैसे देऊन दिलेल्या शिक्षणाची किंमत मोजली की मनाला समाधानी करून घेणारा आपला समाज झाला आहे. यामध्ये भरडला जातो मध्यम वर्गातील विद्यार्थी. या समाजातील मुलं शिकणार कशी? पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी एका वर्षाची फी १६ हजारांच्या पुढे जाऊन पोहचलेली आहे. मग शिक्षण महाग का झाले? अशा शिक्षणामुळे येणाऱ्या काळात ज्यांच्याकडे पैसे त्यांनाच शिक्षण घेता येणार आहे. सहाजिकच आता पदवी मिळाली तर कमावता हो, असा लकडा घरून त्यांच्या मागे लागतोच. तेव्हा त्याला पीएच.डी. किंवा अन्य पदव्युत्तर शिक्षण सोडून द्यावे लागते. मुलींनी पदव्युत्तर शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण वाढते आहे. अपेक्षेनुसार त्यामागे लग्नाची तयारी हे सर्वांत प्रमुख कारण आहे. त्याशिवाय, नोकरी मिळवून घरच्यांना हातभार लावण्यासाठीही मुली त्यांचे अधिक उच्च शिक्षणाचे स्वप्न सोडून देतात.

उच्च शिक्षण घेऊन जर पोट भरेल इतके काम मिळणार नसेल, तर पकोडे विकलेले काय वाईट आहे. त्यात लग्न नाही झाले तर चालेल, परंतु आपल्या कुटुंबाला आपण सुख देऊ. आपल्या आई-वडिलांचे सदैव ऋणाईत राहून काम करून पोट भरू. कशाला देश आणि देशाचा अभिमान? तो आता मनाच्या वेशीवर टांगलेला बरा. आपल्या तरुणांना काम न देता सोडाल, तर हेच करून तुमचा सर्वनाश केल्याशिवाय राहील काय, असे प्रश्न मनात येतात.

ज्या देशात नवतरुण नागरिक रिकामे राहतील तिथे त्यांच्या हाताला काम नाही तर डोक्याला पापबिरू काम करायला आपली व्यवस्था उद्युक्त करीत आहे की नाही. यावर विचार मंथन होणे आवश्यक आहे.

शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांनी शैक्षणिक धोरणाविषयी आपली काही मते नोंदवली आहेत. ते सांगतात..

(१) तुम्ही मुलांना शिकवता म्हणजे काय करता ? मुलांवर फक्त शिक्षण ओतून चालणार नाही.

(२) त्याअगोदर त्या ज्ञानासाठी काही पोषक वातावरण तयार करावे लागेल. आपल्या शिकवण्यापेक्षा मुलांचं शिकणं अत्यंत महत्त्वाचे आहे. या नव्या धोरणामुळे क्रांतिकारी बदल होतील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केलेला आहे.

(३) मातृभाषेतून मिळणारे शिक्षण निश्चितच एक चांगली दिशा देणारे आहे, असे ते सांगतात. तिबेटी शरणार्थींनी भारतात शाळा सुरू करून त्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम चांगला झाल्याचे वांगचूक सांगतात.

(४) आज जगातील २० प्रगत देश आपल्या मुलांना मातृभाषेतूनच शिक्षण देतात. खासगी संस्थेत अल्पपगारात राबणाऱ्या शिक्षकांचे प्रश्न कायमचे सुटले पाहिजेत. शिक्षणात होणारे राजकारण कायमचे थांबले पाहिजे असेही ते सांगतात.

(५) शिक्षणाचे विकेंद्रीकरण गावपातळीपर्यंत झाले पाहिजे. एकच धोरण सगळीकडे कसे उपयुक्त ठरू शकेल याचा विचार करणे आवश्यक आहे.

(६) स्थानिक तज्ज्ञ, त्यांचे ज्ञान अनुभव यांचा उपयोग करून शिक्षण अधिक नाविण्यपूर्ण करता येऊ शकते. मुलांना मिळणारे शिक्षण त्यांच्या बोलीतून मिळायला हवे. घरोघरी ज्या भाषेत मुलं बोलतात त्या भाषेत मुलांना शिक्षण मिळाल्यास अधिक उपयुक्त होईल. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग त्यांच्या जीवनात प्रगती करण्यासाठी होणार आहे, तसेच त्यांना आकलन होण्यासही खूप चांगली मदत होणार आहे.

त्यांना मिळणारे शिक्षण अनुभवजन्य वातावरणातून मिळणे आवश्यक आहे. याचे भान यापुढे आपल्या व्यवस्थेला ठेवावे लागतील. माणूस जोडणारे शिक्षण आपल्या समाजाला मिळाले पाहिजे. थोर मोठ्या लोकांना शिव्या शाप कसे द्यावेत असले बेगडी आदर्श तात्पुरते व्हावा मिळवतील, परंतु कायमस्वरूपी स्वतःच्या कार्याचे अवमूल्यन होताना आपल्याला बघावे लागेल. असले संस्कार समाजमाध्यमामधून आपण समाजमनावर करीत आहोत हे कितपत योग्य आहे. आत्मनिर्भर शिक्षणासाठी ज्यांचे दायित्व आहे त्यांनी पुढे येणे आवश्यक नाही का? आपल्या प्रवाहात घेऊन त्यांना सक्षम कराल तरच आजची पिढी शिक्षणातून आत्मनिर्भर होईल.

**-डॉ. उत्तम करमाळकर**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770




# ऐका.... राहुरी कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ सांगताहेत हे तूर लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान, जाती आणि व्यवस्थापन

भारत देशाचा लोकसंख्याच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांक आहे. एवढ्या एवढ्या मोठ्या देशाला अन्नधान्य पुरवठा करण्यसाठी कडधान्याचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. कडधान्य पिकामध्ये तूर हे खरीप हंगामातील प्रमुख पीक आहे. कडधान्य पिकाचे लागवडीच्या सुधारित तंत्रज्ञानाचा वापर केला गेला पाहिजे.. देशामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, गुजरात व झारखंड हि महत्वाची तूर उत्पादक राज्ये आहेत असून य मध्ये महाराष्ट्र उत्पादनात पहिला व क्षेत्रानुसार दुसऱ्या क्रमांकवर आहे.

देशामध्ये तूर पिकाखाली ४९.०० लाख हेक्टर क्षेत्र असून त्यापासून ४२.२२. लाख टन एवढे उत्पादन झाले व देशाची उत्पादकता ८६१ किलो/हेक्टर आहे. सन २०२२-२३ साली महाराष्ट्र राज्यात तूर या पिकाखाली ११.७५ लाख हेक्टर क्षेत्र होते तर ८.४८ लाख टन एवढे उत्पादन झाले व राज्याची उत्पादकता ७२२ किलो/हेक्टर. तूर पिकाचे सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब खालील प्रमाणे केल्यास निश्चित उत्पादन वाढण्यास मदत होईल.

जमिनीची निवड : तूर लागवडीसाठी मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी असावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ व सेंद्रिय कर्ब ०.५ टक्के पेक्षा जास्त असावा. चोपण क्षारयुक्त जमीन मानवत नाही. आम्लयुक्त जमिनीत पिकाच्या मुळावरील गाठीची योग्य वाढ होत नसल्यामुळे रोपे पिवळी पडतात.

पेरणीची वेळ : तुरीची पेरणी ३० जुन पर्यंत करणे आवश्यक आहे. मान्सूनचा समाधनकारक पाऊस (७५ ते १०० मि.मी) पडल्यानंतर वाफसा येताच कुळवणी करावी. त्यानंतर योग्य ओल असताना तुरीची पेरणी करावी. पेरणी जशी जशी उशिरा होईल त्याप्रमाणे उत्पादनात घट येते. यासाठी जास्तीत जास्त उशिरा ७ जुलै पूर्वी पेरणी करता येइल.

बीज प्रक्रिया : पेरणीपूर्वी टायकोडर्मा ५ ग्रम किवा थायमर २ ग्रम अधिक काबेन्डीन्झीम २ ग्रम प्रति किलो बीयाणांस चोळावे. मुळावरील कार्याक्षम गाठीच्या संख्येत वाढ व हवेतील नत्राच्या स्थिरीकारणासाठी- रायझोबियम २५ ग्रम प्रति किलो बियाणे. जमिनीत स्थिर झालेले' स्फुरद उपलब्धत होण्यासाठी पीएसबी २५ ग्रम प्रती किलो बियाणे.

वाणाची निवड : विपुला, फुले राजेश्र्वरी, बी.एस.एम.आर.-७३६, बी.डी.एन-७११, बी.डी.एन-७१६, बी.डी.एन-१३-४१ (गोदावरी), पी.के.व्ही. तारा, फुले तृप्ती

तुरीची पेरणी पद्धत व अंतर : तुरीचे सलग पीक घ्यावयाचे असल्यास- लवकर तयार होणाऱ्या वाणाची पेरणी ४५ x १० से.मी. अंतरावर करावी.

मध्यम कालावधीच्या वाणाची पेरणी ६०  २० से.मी. किंवा ९० x २० से.मी. अंतरावर करावी.

अलीकडे घेण्यात आलेल्या प्रयोगामध्ये अधिक अंतरावर (१८० x ३० से.मी. किंवा ९० x ६० से.मी.) पेरलेल्या तूर पिकाचे आशादायक उत्पादन मिळालेले आहे.

बियाण्याचे प्रमाण:

मध्यम मुदतीच्या विपुला, फुले राजेश्र्वरी, पी.के.व्ही. तारा, बी.डी.एन-७११ या वाणासाठी हेक्टरी १२ ते १५ किलो.

उशिरा येणाऱ्या आणि जास्त अंतरावर लागवड करावयाच्या वाणासाठी हेक्टरी ५ ते ६ किलो बियाणे वापरावे

खत व्यवस्थापन : सलग तुरीसाठी हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी पेरणी वेळी द्यावे.

आंतरपीक असल्यास ज्या पिकाच्या ओळी जास्त त्या पिकाची शिफारस केलीली खतमात्रा द्यावी.

आंतरमशागत : तुरीचे पिक सुरवातीच्या काळात अतिशय सावकाश वाढते. त्यामुळे तणाचा प्रादुर्भाव जास्त जाणवतो. पीक४५ दिवसाचे होईपर्यंत कोळपण्या कराव्या व खुरपणी करून शेत तणमुक्त ठेवावे. तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास पेरणी नंतर लगेच वाफशावर (पुरेशा ओलावा) पेंडीमिथलीन २.५ ली. प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून जमिनीवर फवारावे.

आंतरपिके : तूर पिकामध्ये आंतरपीक पद्धती फायदेशीर ठरते. यासाठी विविध आंतरपीक पद्धतीची शिफारस करण्यात आली आहे.

तूर पिकाची उत्पादक वाढ सुरु होईपर्यंत लवकर पक्व होणारी इतर पिके आंतरपीक म्हणून घेतल्यास प्रती हेक्टरी उत्पादन वाढून आर्थिक नफा जास्त होतो.

आंतरपीकाचा प्रकार-ओळीचे प्रमाण:

तूर + बाजरी : १:२
तूर + सोयबीन : १:३
तूर + कापूस : १:६ किंवा १:८
तूर + मुग : १:२
तूर + उडीद : २:४
तूर + ज्वारी : २:४

शेंडा खुडणे : तूर जर १८० x ३० सें.मी किंवा ९० x ६० सें.मी अंतरावर टोकण पद्धतीने लागवड केली असेल तर पेरणीनंतर एकदाच ४५ दिवसांनी झाडाच्या वरचा ५ सें.मी शेंडा खुडावा. त्यामुळे झाडाची उंची मर्यादित राहून प्राथमिक व दुय्यम फांद्यची संख्या वाढते त्यामुळे उत्पादनात १२ ते १५% वाढ होते असे प्रयोगाअंती सिद्ध झालेले आहे.

**तुरीचे पुनर्लागवड तंत्रज्ञान (बिदर तंत्रज्ञान)**

प्लास्टिक च्या बग (९ x ४) साईज मध्ये घ्याव्यात व त्या मध्ये माती, खत आणि वाळू (७:२:१) या प्रमाणात घ्यावी.प्लास्टिक बग मध्ये दोन बिया तुरीच्या लावाव्यात.




लावण्याचा कालावधी १५ मे ते ३० मे दरम्यान लागवड करावी.रोपांची वाढ झाली कि ३० दिवसांनी पुनर्लागवड शेतात करावी. लागवड करताना दोन रोपे व सरया मधील अंतर १८० x ३० सेमी इतक असाव. एक एकर जमिनी साठी ७४०४ एवढी रोपे लागतात

तुरी मध्ये शेंडा हा ४५ दिवस पेरल्यापासून व रोपांचीपुनर्लागवड केल्या पासून १५ दिवसांनी शेंडा खुडावा.

रोग व्यवस्थापन : तूर पिकावर प्रामुख्याने मर व वांझ रोग येतात.

मर रोग : लक्षणे: रोगाची सुरुवात रोपावस्थेपासून होत असली तरी रोपे, फुले व शेंगा येईपर्यंत रोगाशी झगडत असतात हा रोग प्युजेरियम नावाच्या बुरशीमुळे होतो. या रोगाची सुरवात जमिनीत होवून त्यांचे कवकतंतू मुळावाटे झाडात शिरून अन्ननलिकेत वाढत जातात त्यामुळे अन्ननलिकेतून पाणी आणि अन्नद्रव्ये घेणे बंद होते. रोगग्रस्त झाडाची पाने पिवळी पडून ती जमिनीकडे झुकतात. सुरवातीस काही फांद्या आणि नंतर संपूर्ण झाडच वाळून जाते. खोडाचा व मुळाचा आतील भाग काळा पडतो आणि मर झालेल्या खोडावर तांबूस रंगाचे पट्टे दिसतात नंतर फांद्या शेंड्याकडून खाली वाळतात. मर रोग फुले येण्यापूर्वीच आला तर १००% नुकसान होते, तसेच शेंगा झाडावर पक्व होत असताना रोग आल्यास उत्पादनात ३०% घट होत असे.

उपाय : मर आणि वांझ हे तुरीवरील रोग आहेत. मर आणि वांझ या रोगांचा रोगग्रस्त नियंत्रणाचा उत्तम उपाय म्हणजे या रोगांना प्रतिकारक्षम असणारया वाणाची निवड करणे. उ.दा. बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३, विपुला पिकाची फेरपालट करणे. पेरणीपूर्वी बियाण्यास टायकोडर्मा ५ ग्रम प्रती किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. उन्हाळयात जमीन खोल नागरून चांगली तापू द्यावी. त्यामुळे मातीतील हि बुरशी जास्त उष्ण तापमानामुळे मरून जाईल.

उपाय: वांझ रोग

खोडवा तुर घेऊ नये. एरियोफाईड कोळीचा प्रादुर्भाव वाढू नये याकरिता कोळी नाशकाची फवारणी

(उदा: डायकोफोल अथवा गंधक २० मि. ली १० लिटर पाण्यात टाकून फवारणी) वेळेत करावी. वांझ रोगग्रस्त झाडे समूळ नष्ट करावेत.

अशा पद्धतीने आपण जर सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केला तर निशितचआपणास तुरीचे चांगले उत्पादन प्राप्त होईल.

संपर्कासाठी पत्ता: डॉ. अरविंद तोत्रे, वरिष्ठ संशोधन सहकारी, कडधान्य सुधार प्रकल्प मफुकृवि राहुरी ४१३ ७२२. ७७०९०२०१०१

लेखन - डॉ. अरविंद तोत्रे, डॉ. अमृता जंगले आणि सुयोग ठोंबरे

१,३: कडधान्य सुधार प्रकल्प मफुकृवि राहुरी ४१३ ७२२.

२: अर्थशास्त्र विभाग, मफुकृवि राहुरी ४१३ ७२२



# पांढऱ्या कांद्याची शेती उघडणार शेतकऱ्यांचे नशीब, जाणून घ्या शेतीची योग्य पद्धत

कांदा ही सर्वात सामान्य भाज्यांपैकी एक आहे जी प्रत्येक घरात दररोज वापरली जाते. पण असे बरेच लोक आहेत ज्यांना कांद्याची चव आवडते पण कांद्याचा तिखटपणा थोडा कमी व्हावा असे वाटते. अशा परिस्थितीत आपण त्याची इच्छा पूर्ण करतो. पुढच्या वेळी बाजारात जाल तेव्हा पांढरा कांदा खरेदी करा. ते अगदी सामान्य कांद्यासारखे दिसतात परंतु पांढरे असतात.

लाल किंवा पिवळ्या कांद्याच्या तुलनेत त्यांची चव कमी तिखट आणि सौम्य गोड असते. यासोबतच, लाल कांद्याच्या तुलनेत डोळ्यांना कमी डंक येतो, म्हणजेच त्याचा वासही सौम्य असतो. एवढेच नाही तर पांढऱ्या कांद्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत, ज्यांची लेखात पुढे चर्चा केली जाईल. त्याच्या चवीमुळे आणि आरोग्यासाठी फायदेशीर असल्याने, त्याची मागणी बाजारात जास्त राहते आणि सामान्य कांद्यापेक्षा जास्त दराने विकली जाते.

अशा परिस्थितीत शेतकरी बांधव शेती करून चांगला नफा कमवू शकतात. सामान्य कांदा लागवडीपेक्षा त्याची लागवड शेतकऱ्यांना अधिक नफा देऊ शकते. चला तर मग जाणून घेऊया त्याच्या लागवडीची योग्य वेळ आणि पद्धत. पांढऱ्या रंगाच्या कांद्याची लागवड देशातील महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा, राजस्थान, तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये केली जाते. खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात याची लागवड करता येते. त्याचे पीक सुमारे १०० ते १२० दिवसांत तयार होते. त्याचे प्रति हेक्टर सरासरी उत्पादन ३० ते ४० टन आहे. ते ३ महिन्यांपर्यंत साठवले जाऊ शकते. त्याच्या लागवडीसाठी सर्वात अनुकूल तापमान २०ओउ ते २५ओउ दरम्यान असते.

पांढरा कांदा लागवडीसाठी पीएच ६.० ते ६.८ असलेली माती सर्वात योग्य मानली जाते. मातीचा चांगला निचरा झाला पाहिजे, कारण पाणी साचलेल्या जमिनीत कांदे चांगले वाढत नाहीत. पांढरे कांदे वाढवण्यासाठी सतत ओलावा आवश्यक असतो, म्हणून माती ओलसर ठेवणे महत्वाचे आहे, परंतु लक्षात ठेवा की तेथे पाणी साचू नये.

म्हणजे जास्त पाणी देऊ नका. म्हणजेच जेव्हा जेव्हा मातीचा वरचा थर कोरडा होतो तेव्हा तुम्ही पांढऱ्या कांद्याच्या झाडांना पाणी द्यावे. माती पुन्हा ओलसर होईपर्यंत त्यांना फक्त पाणी द्या. होय जमिनीत पाणी साचणार नाही याची खात्री करून घ्या कारण जास्त पाणी झाडे सडू शकते.

पांढऱ्या कांद्याची लागवड करताना लक्षात ठेवण्याची आणखी एक आवश्यक गोष्ट म्हणजे प्रत्येक रोप दुसऱ्यापासून पुरेशा अंतरावर असल्याची खात्री करणे. त्यांची एकमेकांपासून सहा इंच अंतरावर लागवड करण्याचा सल्ला दिला जातो. जर तुम्ही तुमचे कांदे ओळींमध्ये लावत असाल तर तुम्हाला ओळींमध्ये योग्य जागा द्यावी लागेल. पांढऱ्या कांद्याच्या ओळी एकमेकांपासून बारा इंच अंतरावर असाव्यात.

# स्वीट कॉर्नची शेती करणारे शेतकरी कमावतात भरघोस नफा, जाणून घ्या..



पावसाळा सुरू होताच प्रत्येकाच्या मनात कणीस खाण्याची इच्छा निर्माण होते. फायबर समृद्ध भुट्टा आरोग्यासाठी उत्तम आहे. त्यामुळेच बाजारात मक्याची मागणी वाढते आणि शेतकऱ्यांना त्याचा विचारलेला भाव मिळतो. भुट्टा, ज्याला इंग्रजीत स्वीट कॉर्न असेही म्हणतात, अनेक प्रकारे खाल्ले जाते. काही लोक ते शिजवून खातात.

तर काहीजण भाजून खातात. तर काहींना त्याचे सूप प्यायला आवडते. जेव्हा ते सुकते तेव्हा लोक पॉपकॉर्न बनवतात आणि ते आनंदाने खातात. तर, आजच्या लेखात आपण स्वीट कॉर्नची लागवड कशी करावी हे सांगू. वास्तविक, स्वीट कॉर्न ही मक्याची एक अतिशय गोड जात आहे, जेव्हा मक्याचे पीक पक्व होण्यापूर्वीच दुधाळ स्थितीत त्याची काढणी केली जाते तेव्हा त्याला स्वीट कॉर्न म्हणतात.

भारताबरोबरच इतर देशांमध्येही स्वीट कॉर्नला खूप पसंती दिली जाते. यामुळेच स्वीट कॉर्नची मागणी पूर्ण करणे हे कधी कधी मोठे आव्हान बनते. म्हणूनच जर शेतकरी सामान्य मका पिकवत असतील तर ते दुप्पट उत्पन्नासाठी स्वीट कॉर्नची लागवड करू शकतात. स्वीट कॉर्नची लागवड मक्याच्या लागवडीप्रमाणेच केली जाते. मात्र, स्वीट कॉर्नच्या लागवडीमध्ये मका पिकाच्या अगोदर उपटला जातो, त्यामुळे शेतकऱ्यांना अल्पावधीत चांगला नफा मिळतो.

मक्याचे पीक घेताना फक्त प्रगत जाती निवडाव्यात हे लक्षात ठेवा. कमी वेळेत पक्व होणाऱ्या कीटक प्रतिरोधक जाती निवडणे उत्तम. शेत तयार करताना ड्रेनेजचे व्यवस्थापन करणे सुनिश्र्चित करा, यामुळे पिकामध्ये पाणी साचणार नाही. स्वीट कॉर्न हे संपूर्ण भारतात घेतले जात असले तरी उत्तर प्रदेशात त्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.

आम्ही तुम्हाला सांगतो, उत्तर भारतात खरीप हंगामात म्हणजेच जून ते जुलै दरम्यान पेरणी केली जाते. रब्बी आणि खरीप या दोन्ही हंगामात तुम्ही स्वीट कॉर्नची लागवड करू शकता. यामुळे शेतकरी कमी दिवसांमध्ये चांगले उत्पादन घेत आहेत.

# कांद्याच्या दरात ५० टक्के घसरण; कांदा पुन्हा शेतकऱ्यांचा वांदा करणार?

पुणे जिल्ह्यातील मंजर बाजार समितीत कांदा दरात ५० टक्क्यांनी घसरण झाली आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. मागील काही दिवसांपासून कांद्याचे दर वाढणार अशा बातम्या येत होत्या. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी कांद्याची साठवणूक केली होती. पण साठवणूक केलेला कांदा एकाच वेळी बाजारात आल्याने आवक वाढली आणि त्यामुळे दर घसरले आहेत.

बाजार समितीत कांद्याची आवक वाढल्याने जवळपास ५० टक्क्यांनी दरात घसरण झाली आहे. शनिवारी मंचर बाजार समितीत ४२ हजार पिशव्यांची आवक झाली. मालाची जास्त आवक झाल्यामुळे मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचा दर ३० ते ३२ रुपये प्रतिकिलो होतो तो १७ ते २२ रुपयांपर्यंत आला. भावात घसरणीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

नाशिक जिल्ह्यात सर्वांत जास्त कांद्याचे उत्पादन घेतले जाते. तर लासलगाव बाजार समितीत कांदा व्यवहार सगळ्यात मोठी आहे. मात्र या ठिकाणी कांद्याचे दर स्थिर आहेत. या ठिकाणी कांद्याला प्रतिक्विंटल सरासरी दर २ हजार २५० रुपये मिळत आहे. परंतु पुण्यात दर घसरल्यामुळे नाशिकमध्ये दर घसण्याची भीती शेतकऱ्यांना आहे.

दरम्यान, राज्य सरकारने मार्चमध्ये जाहीर केलेले ३५० रुपये अनुदान अद्यापही कांदा उत्पादकांना मिळाले नाही. त्यामुळे शेतकरी त्या प्रतिक्षेत आहेत. यासंदर्भात बोलताना पणन मंत्री अब्दुल सत्तार शेतकऱ्यांना अनुदान १५ ऑगस्टपर्यंत मिळेल, असे सांगितले होते. पण हे अनुदान अद्यापही शेतकऱ्यांना मिळाले नाही. शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी वित्त विभागाने पणन विभागाला ४६५ कोटी ९९ लाख रुपये निधी दिला आहे. पण तो निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर कधी जमा होणार हे पाहणं आता महत्त्वाच आहे.



# लाल भेंडी शेतकऱ्यांना बनवेल श्रीमंत, या पद्धतीने करा लागवड

शेतकरी भाजीपाला लागवड करून जेवढे उत्पन्न पारंपारिक शेती करून घेतात तेवढे मिळत नाही. विशेषत: खास भाजीपाल्याची लागवड केल्यास अधिक उत्पन्न मिळते. आपण ज्याच्याबद्दल बोलत आहोत ते म्हणजे लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडी. लाल भेंडीचे वैशिष्ट्य म्हणजे ती हिरव्या भेंडीपेक्षा जास्त फायदेशीर असते.

यासोबतच त्याचे पीकही सामान्य भेंडीच्या तुलनेत लवकर पिकते. लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडीमध्ये विशेष औषधी गुणधर्म आहेत, त्यामुळे मोठ्या शहरांमध्ये त्याची मागणी कायम आहे. लाल भेंडीच्या लागवडीसाठी १ किलो बियाणे २४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे, जे अर्धा एकर जमिनीत लागवड करता येते.

जर आपण लाल भेंडी म्हणजेच लाल भेंडीपासून कमाईबद्दल बोललो तर लाल भेंडीची किंमत हिरव्या भेंडीपेक्षा ५-७ पट जास्त आहे. हिरवी भेंडी ४० ते ६० रुपये किलो दराने बाजारात उपलब्ध असताना २५० ते ३०० ग्रॅम लाल भेंडी ३०० ते ४०० रुपये किलो दराने विकली जाते.

लाल भेंडीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे लाल भेंडीची मागणी देशापेक्षा परदेशात जास्त आहे. परदेशातही त्याची भरपूर लागवड होते. लाल भेंडीमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात, ज्याला लाल भेंडी असेही म्हणतात. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि आयर्न मुबलक प्रमाणात आढळतात. ही लाल बोट साखरेच्या रुग्णांसाठी रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते.

फक्त लागवड करताना त्यात सिंचनाची कमतरता भासणार नाही याची विशेष काळजी घ्यावी लागते. लागवडीनंतर हे पीक अवघ्या ४० ते ५० दिवसांत काढणीसाठी तयार होते. लाल भेंडी ही अशी भाजी आहे जिची उन्हाळ्यात मागणी जास्त असते. यामुळेच भारतीय शेतकरी आजकाल रेड लेडीफिंगरपासून भरपूर नफा कमावत आहेत.

# इथेनॉलच्या किंमतीत वाढ व साखर निर्यातीच्या धोरणावर तातडीने निर्णय घेण्याची गरज

शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी 'साखर उद्योग स्थिर करण्यासाठी साखरेचा बाजारातील किमान बाजारभाव ३८ रूपये करण्याची मागणी केली आहे. तसेच इथेनॉलच्या किंमतीत वाढ व साखर निर्यातीच्या धोरणावर तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याने केंद्र सरकारने तातडीने यामध्ये तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे केली.

तसेच सांगली कोल्हापूर बायपास मार्गे चौपदरीकरण करताना मुरमाचा भराव टाकू नये, अन्यथा सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतांश गावे महापुराच्या पूर्ण विळख्यात जातील. त्यामुळे सदर रस्ता करताना पिलरचा वापर करून रस्ता करावा, अशी मागणी देखील यावेळी केली.

नितिन गडकरी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन साखर उद्योगाबरोबर, राष्ट्रीय महामार्गांचे सुरू असलेली कामे व राज्यातील राजकीय घडामोडींवर चर्चा केली.

देशामध्ये ऊस उत्पादक शेतकरी वगळता केंद्र सरकारच्या धोरणामुळे सोयाबीन, कापूस, कांदा, धान उत्पादक शेतक-यांसह सर्व शेतकरी संकटात आर्थिक संकटात सापडले आहेत. नितीन गडकरी यांच्या विशेष प्रयत्नामुळे केंद्र सरकारने इथेनॉलचे धोरण स्थिर केल्यामुळे साखर कारखानदारांना थोडे चांगले दिवस आले आहेत.

वाढलेल्या महागाईमुळे उसाचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेली असून यंदा एफ.आर. पी पेक्षा वाढीव दर दिल्याशिवाय हा उत्पादन खर्च निघणे अशक्य आहे. याकरिता साखरेचा बाजारातील किमान दर ३८ रूपये करून साखर निर्यात धोरण निश्र्चित करण्याची गरज आहे.

देशात पामतेल मोठ्या प्रमाणात आयात केले जाते. याचा विपरीत परिणाम सोयाबिनच्या दरावर होत आहे. सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या सोयाबिन उत्पादीत होत असलेल्या भागात होत आहेत. तसेच सोयाबिनच्या पेंडीच्या आयातीवर देखील निर्बंध आणणे गरजेचे असल्याचे स्पष्ट मत नितिन गडकरी यांनी व्यक्त केले.

याबरोबरच राष्ट्रीय महामार्गावरील रत्नागिरी - कोल्हापूर ते अंकली व पुणे-कागल या महामार्गातील रस्त्याच्या कामातील त्रुटीबाबत व सुरू होत असलेल्या कामामुळे संभाव्य महापुराच्या परिस्थिती बाबत सविस्तर चर्चा केली.

तसेच अंकली कोल्हापूर बायपास मार्गे चौपदरीकरण करताना भराव न टाकता पिलर उभे करून रस्ते तयार केले जातील, असेही त्यांनी आश्वासन दिले. यावेळी संघटनेतील पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता; हवामान खात्याचा अंदाज

मागील तीन आठवड्यापासून राज्यात पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे शेतकरी पावसाची वाट पाहत आहे. तर पेरणी केलेली पीके पाण्याअभावी जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहेत. पण आता राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होतंय. त्यामुळे उद्यापासून राज्याच्या अनेक भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पाऊस सुरु होईल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

याचबरोबर विदर्भात आणि मराठवाड्याच्या काही भागात जोरदार



पावसाचा यलो अलर्टही हवामान खात्याने दिला आहे.विदर्भात उद्या येलो अलर्ट आहे. बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ठिकठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांसह जोरदार पावसाचा अंदाज आहे. खानदेशात देखील पावसाचा शक्यता आहे. राज्याच्या इतर भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडले, असाही अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार १९ ऑगस्ट २०२३


## सारथीच्या उपक्रमांचे चावडी वाचन

लातूर : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे, या संस्थेकडून १५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील ग्रामपंचायत स्तरावर संशोधक विद्यार्थ्यांनी चावडी वाचन करून सारथीच्या उपक्रमांची माहिती पोहचवावी, असे निर्देश सारथीचे मा.व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी दिले होते. सारथी संस्थेची माहिती तळागळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी दयानंद कला महाविद्यालय, लातूर चे संशोधक विद्यार्थी सागर गणपत यादव यांनी तळेगाव घाट येथे मी सारथीचा लाभार्थी या कर्तव्य भावनेतून सारथी कडून मराठा, हिंदू- मराठा, कुणबी - मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली. सागर गणपत यादव हे दयानंद कला महाविद्यालय येथे हिंदी विषयात पूर्ण वेळ पीएच.डी. संशोधक विद्यार्थी म्हणुन कार्य करीत आहेत.

## सम्यक समाज संघा तर्फे प्राचार्य डॉ. वाघमारे यांचा सत्कार

लातूर : महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत तथा साहित्यिक प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे यांची समीक्षा फाऊंडेशन व इतर संस्थेच्यावतीने मराठवाड्यात पहिल्यांदा होत असलेल्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सम्यक समाज संघ, लातूर तर्फे त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी सम्यक समाज संघाचे अध्यक्ष ॲड. मंचकराव डोणे, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, लसाकमाचे कार्यकर्ते नरसिंग घोडके गुरुजी, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी. पी. सूर्यवंशी, डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्राचार्य डॉ. वेदप्रकाश मलवाडे, डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे आणि प्रा. पंचशीला डावकर यांची उपस्थिती होती. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे म्हणाले की, आज समाजामध्ये लोकशाही कार्यप्रणाली अधिक सक्षम पद्धतीने रुजवण्यासाठी परस्परांमध्ये संघटन असणे अत्यंत आवश्यक आहे. सम्यक समाज संघा मार्फत विविध उपक्रमाच्या माध्यमातून भारतीय संविधान हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. मंचकराव डोणे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी आभार मानले.



# अंबाजोगाई रोडच्या दुभाजकातून निघाला दोन गाड्या कचरा

### नागरिकांनी दुभाजकात कचरा टाकण्यापेक्षा घंटागाडीतच टाकावा-आवाहन

लातूर : अंबाजोगाई रस्त्यावरील पडिले कॉम्प्लेक्स समोरील दुभाजक ते एस. टी. वर्कशॉप समोरील दुभाजकाची ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सदस्यांनी स्वच्छता केली. या मध्ये दोन गाड्या गवत, केरकचरा, दारूच्या बाटल्या, भंगार साहित्य बाहेर काढण्यात आले.

मागील चार वर्षापासून ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या माध्यमातून वर्षातून दोनदा हे दुभाजक स्वच्छ करण्यात येत आहे.

यावेळी झाडांना आळे करून झाडांच्या छाटण्या करण्यात आल्या. दुभाजकास कचरा कुंडी न समजता कचरा घंटा गाडी मध्ये टाकावा, असे आवाहनही ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने सुलेखा कारेपूरकर यांनी केले.

# ज्येष्ठांच्या समस्यांसाठी ज्येष्ठ नागरीक पंधरवाडा

## -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : ज्येष्ठ नागरिक म्हणजे अडगळीची वस्तू म्हणून त्यांना अतिशय वाईट वागणी दिली जाते, ही अतिशय चुकीची बाब आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय ज्येष्ठ नागरिक समितीच्यावतीने १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीत विशेष पंधरवडा आयोजित करून विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मिटिंग हॉलमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय ज्येष्ठ नागरिक समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, सहायक आयुक्त समाज कल्याण एस. एन. चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. टी. नाईकवाडी, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ए. सी. चंडगे यावेळी उपस्थितीत होते.

जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेवून त्यांचा निपटारा करण्यासाठी १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. यासाठी सर्व संबंधित विभागांची मदत घेवून सूक्ष्म नियोजन करावे. ग्रामीण भागात विशेष ग्रामसभा आयोजित करून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच ज्येष्ठ नागरिकांशी कुटुंबातील व्यक्तींचा सुसंवाद राहील, यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

१ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूर शहर महानगरपालिकेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करावे. तसेच त्यांना आवश्यक साधनांचे वितरण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी १४५६७ हा टोल फ्री क्रमांक असल्याची माहिती समाज कल्याण सहायक आयुक्त श्री. चिकुर्ते यांनी यावेळी दिली.



# ट्रॉफीक जाम, लातूरकर वैतागले

लातूर : अपुरे रस्ते, रस्त्यावरील अतिक्रमण, बेशिस्त वाहतूक, वाहनांची गर्दी यामुळे लातूर शहरातील रस्ते दिवसभर ट्रॉफीक जाम होत असून लातूरकर सततच्या ट्रॉफीक जामला अक्षरशः वैतागले आहेत.

लातूर शहरामध्ये शिवाजी चौक, दयानंद गेट, बार्शी रोड, तहसील कार्यालयासमोरचा रस्ता, अशोक हॉटेल चौक, खोरे गल्ली, अंबाजोगाई रोड, औसा रोड, राजीव गांधी चौक, नाईक चौक, बाभळगाव चौक, बसवेश्वर चौक, मार्केट यार्ड, कव्हा रोड, गुळ मार्केट, नांदेड रोड, मिनी मार्केट, खोरी गल्ली, शाहु महाराज चौक, गंजगोलाई, मस्जीद रोड, दयाराम रोड, सुभाष चौक, मध्यवर्ती बसस्थानक, गांधी मार्केट आदी परिसरात सतत ट्रॉफीक जाम होत आहे. एखादे अवजड वाहन अथवा बस, ट्रॅव्हल्स आली तर रस्ताच पूर्णपणे बंद होतो. आहे त्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या व्यापाऱ्यांचे अतिक्रमण वाढले आहे. त्या त्या व्यापारी, रूग्णालय या ठिकाणी पार्किंगची सोय नसल्याने सर्व वाहने रस्त्यावरच उभी केली जातात. अशात मोकाट गायी अक्षरशः रिंगण करून भर रस्त्यात ठाण मांडून असतात. छोटे-मोठे व्यावसायीक, फेरीवाले, गाडे यांनी आपली दुकाने रस्त्यावरच मांडल्याने बहुतेक रस्ते हे चिंचोळे झाली आहेत. शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या स्कूल बस, ऑटोरिक्षा तसेच विविध रूग्णालयात येणाऱ्या व जाणाऱ्या ॲम्बुलन्स यांच्यासाठीही रस्त्यात अडथळेच अडथळे निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. या अडथळ्यातून नागरिकांची सुटका करावी अशी मागणी होत आहे. ज्येष्ठ नागरीक, महिला, विद्यार्थी यांना तर सततच्या ट्रॉफीक जाममुळे दबावाखाली वावरावे लागत आहे. पोलीस, पालिका व जिल्हा प्रशासनाने यातून तात्काळ मार्ग काढावा, अशी मागणी होत आहे.

# ऊस विकास परिसंवादात ऊस शेतीतील बदल व तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन

निवळी : येथील विलास सहकारी साखर कारखाना लि. येथे कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना ऊसशेतीमध्ये दिवसेदिवस होत असलेले बदल आणि आधुनीक ऊसशेतीचे ज्ञान देता यावे यासाठी एक दिवसीय प्रशिक्षण आणि ऊस विकास परीसंवाद कार्यक्रम शेतकी विभागातील कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता. या परिषदेत वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी (बु) पूणे यथील तज्ञांनी मार्गदर्शन केले.

विलास सहाकरी साखर कारखाना कार्यस्थळी गुरूवार दि. १७ ऑगस्ट रोजी एक दिवसीय प्रशिक्षण आणि ऊस विकास परीसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास व्हा.चेअरमन रवीद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील शास्त्रज्ञ व मुख्य जनसंपर्क अधिकारी आर बी. भोईटे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्री. एस. जी. दळवी, डॉ. श्री. जी. आर. पवार आणि वरिष्ठ ऊस रोग विकृती शास्त्रज्ञ डॉ. जी. एस. कोटगीरे, मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन डीग्रसे यांनी मार्गदर्शन केले.

विलास सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाने नेहमीच ऊसवीकासाचे नवनवीत तंत्र कारखाना कर्मचारी आणि सभासद, ऊसउत्पादक यांना अवगत व्हावे यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन केले. राज्याचे माजी वैदयकीय व सांस्कृतीक कार्यमंत्री तथा माजी पालकमंत्री कारखान्याचे संस्थापक चेअरमन तथा संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख व कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतुन ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल व आधुनिक ऊसयोती पध्दती यांचा अभ्यास होणेसाठी व त्यांचा वापर कारखाना परिसरातील ऊस उत्पादकांना करता यावा याकरीता एक दिवशीय प्रशिक्षण व ऊस विकास परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात वसंतदादा शुगर इनस्टिटयुट, मांजरी (बु) लातूर येथे पूणे यांचे तज्ञा मार्फत शेतकी विभागातील कर्मचा-यांना मार्गदर्शन केले. यावेळी तज्ञांनी ऊस लागवड, निंदणी, पाणी व्यवस्थापन, खते व्यवस्थापन, कीटकनाशक व्यवस्थापन, रोग व्यवस्थापन, ऊस तोडणी आणि ऊस गाळप या विषयांवर ऊस उत्पादकांना मार्गदर्शन केले. त्यांनी ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल आणि आधुनिक पद्धती यांचा वापर करून ऊस उत्पादन कसे वाढवता येईल याबद्दल ऊस उत्पादकांना माहिती दिली. तज्ञांना ऊस उत्पादकांनी ऊस शेतीशी संबंधित विविध प्रश्न विचारले. ऊस उत्पादकांच्या या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. ऊस उत्पादकांना ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल आणि आधुनिक पद्धतीचा वापर करून ऊस उत्पादन वाढवता येईल यांची माहीती मिळाली.

यावेळी बोलतांना कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे म्हणाले, ऊस शेतीसाठी लागणारे आधुनिक तंत्रज्ञान आवगत करुन त्याचा वापर कारखाना परिसरांतील ऊस उत्पादकांसाठी करुन हेक्टरी उत्पादकता वाढवावी असे कृषी विभागातील कर्मचारी यांना सांगीतले. तर संचालक अनंत बारबोले यांनी कमीत कमी क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त उत्पादकता वाढविण्याचा मंत्र सर्व ऊत्पादकां पर्यंत पोहोचला पाहिजे. तर कार्यक्रमाचे प्रास्तावीक करतांना कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. संजीव देसाई यांनी ऊस उत्पादकांची हेक्टरी ऊस उत्पादकता वाढवण्यासाठी विविध नाविन्यपुर्ण ऊस विकासाचे उपक्रम आपल्या कारखान्याकडून सातत्याने राबविले जातात. यापूढे देखील अशा प्रकारचे उपक्रम आणि योजना कारखाना परिसरांमध्ये राबविल्या जातील असे सांगितले.

या एक दिवशीय प्रशिक्षण व ऊस विकास परिसंवादात वसंतदादा शुगर इनस्टिटयुट येथील तज्ञ आर.बी.भोईटे (शास्त्रज्ञ व मुख्य जनसंपर्क अधिकारी व्हि.एस.आय.) डॉ.श्री. एस.जी.दळवी (वरिष्ठ शास्त्रज्ञ ), डॉ. जी. आर. पवार व त्याच्या सोबत डॉ.जी.एस. कोटगीरे (वरिष्ठ ऊस रोग विकृती शास्त्रज्ञ) यांनी मार्गदर्शन केले. सदरील एकदिवशीय परिसंवाद व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सुत्रसंचलन शेख यांनी केले तर अभार एस. डी. नरवडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ऊस विकास अधिकारी जहागीरदार सी.एम., शेतकी अधिकारी आनेराये एस.एस., कृषि पर्यवेक्षक, सोमासे, देसाई, मेंढेकर, पाटील, नवनाथ पाटील, कदम सर्व कृषि मदतणीस व सर्व शेतकी विभागातील कर्मचारी उपस्थीत होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासठी निकम ए. एन., भिसे एस.डी., दिलीप सोनकांबळे, दगडु काटकर, सुर्यवंशी एस. एस. यांनी परिश्रम घेतले.

# इनरव्हील क्लब कडून लातूर कपडा बँकेला कपडे

लातूर : मागील तब्बल ८ वर्षांपासून वंचित घटकांना, गोरगरीब नागरिकांना परिधान करण्यासाठी चांगले कपडे, थंडीच्या दिवसात त्यांचा थंडीपासून बाचाव होईल असे उबदार कपडे वाटप करणाऱ्या लातूर कपडा बँकेला सातत्याने सामाजिक कार्यात पुढाकार घेणाऱ्या इन्नर व्हील क्लब ऑफ लातूर तर्फे कपडे डोनेट करण्यात आले आहेत.

यावेळी लातूर कपडा बँकेचे संकल्पक तथा विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ.संतोषकुमार डोपे, इन्नर व्हील क्लब ऑफ लातूरच्या अध्यक्षा मेघा अग्रोया, झोनल सह समन्वयक अनुराधा अग्रवाल, क्लब संपादक डॉ.प्रिती अग्रोया, सदस्या सहारा शेख, लातूर कपडा बँकेचे विद्यमान सचिव श्री. विनयजी जाजू सर,तर लातूर कपडा बँकेचे कार्यकारी सचिव सुनिलकुमार डोपे यांच्यासह लातूर कपडा बँक आणि इन्नर व्हील क्लब ऑफ लातूरचे सर्व सन्माननीय सभासद,पदाधिकारी उपस्थित होते.अनेक सामाजिक संघटना आणि सर्व समाजशील नागरिकांच्या सहकार्याने लातूर कपडा बँक अविरतपणे कार्य करत असून अनेक वंचितांना कपड्यांच्या स्वरूपात तसेच अन्य उपक्रम राबवून आधार देण्याचे कार्य केले जात आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासत इन्नर व्हील क्लब ऑफ लातूर यांच्या वतीने लातूर कपडा बँकेला कपडे डोनेट करण्यात आले होते. दरम्यान, सद्यस्थितीत लातूर कपडा बँकेमध्ये कपड्यांची कमतरता भासत असल्यामुळे लातूर नगरीतील सुज्ञ नागरिकांनी आपल्याकडे असणारे चांगल्या स्थितीतील कपडे लातूर कपडा बँकेला डोनेट करावे आणि या समाजोपयोगी कार्यात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन लातूर कपडा बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे विभागीय कार्यलय लातूर येथे सुरु होणार

लातूर : संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय लातूर येथे लवकरच सुरु होणार असल्याची माहिती महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.टी. जिभकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय लातूर येथे सुरु करण्यात यावे. जेणेकरून लातूर, उस्मानाबाद, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील समाजबांधवांची औरंगाबाद येथे विभागीय कार्यालयामध्ये जाताना होणारी गैरसोय थांबेल, अशी मागणी काही सामाजिक संघटनांनी केली होती. या मागणीची दखल घेत महामंडळ मुख्यालयाने कार्यवाही सुरु केली आहे.

मुख्यालयाने याबाबत पाठविलेल्या प्रस्तावाला संचालक मंडळाने २१ जून २०२३ रोजी मंजुरी दिली आहे. तसेच प्रशासकीय कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

लवकरच लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळाचे विभागीय कार्यालय सुरु होणार असल्याने समाज बांधवांना लाभ होईल, असे जिभकाटे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## CHANGE IN NAME

I have change my name PATHAN MUJIB to PATHAN MUJEEB AMINODDIN henceforth this declaration and will be known by this name. I will use PATHAN MUJEEB AMINODDIN in future. The same name will be used by my husband / wife, children and family .
OLD NAME : PATHAN MUJIB
NEW NAME : PATHAN MUJEEB AMINODDIN
ADDRESS : HOTEL CHOTUMIYA, KHORI GALLI, LATUR (M.S.) - 413512

## CHANGE IN NAME

I have change my name PATHAN SHAHZIYA to PATHAN SHAZIYA MUJEEB henceforth this declaration and will be known by this name. I will use PATHAN SHAZIYA MUJEEB in future. The same name will be used by my husband / wife, children and family .
OLD NAME : PATHAN SHAHZIYA
NEW NAME : PATHAN SHAZIYA MUJEEB
ADDRESS : HOTEL CHOTUMIYA, KHORI GALLI, LATUR (M.S.) - 413512

## CHANGE IN NAME

I have change my name SHAZIYA MUJIB PATHAN to SHAZIYA MUJEEB PATHAN henceforth this declaration and will be known by this name. I will use SHAZIYA MUJEEB PATHAN in future. The same name will be used by my husband / wife, children and family .
OLD NAME : SHAZIYA MUJIB PATHAN
NEW NAME : SHAZIYA MUJEEB PATHAN
ADDRESS : HOTEL CHOTUMIYA, KHORI GALLI, LATUR (M.S.) - 413512

## CHANGE IN NAME

I have change my name MUJIB PATHAN to MUJEEB AMINODDIN PATHAN henceforth this declaration and will be known by this name. I will use MUJEEB AMINODDIN PATHAN in future. The same name will be used by my husband / wife, children and family .
OLD NAME : MUJIB PATHAN
NEW NAME : MUJEEB AMINODDIN PATHAN
ADDRESS : HOTEL CHOTUMIYA, KHORI GALLI, LATUR (M.S.) - 413512

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते